# जिल्हाधिकारी कार्यालय ,सांगली
# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष
# सांगली मिरज रोड,विजयनगर सांगली
# जाहिर नोटीस

क्र.गृह.1/कार्या-6/आ.नियं.क./आरआर- ७०० /२०२०

दिनांक: २२/०६/२०२०

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा बळकटीकरण करणे अंतर्गत मेगा फोन** इत्यादी साहीत्य खरेदी करणेसाठी दर पत्रके मागविणेबाबत.

ज्याअर्थी, संभाव्य पावसामुळे निर्माण होणा-या महापुराच्या परिस्थीतीचा सामना करणेसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणे अंतर्गत आपतीग्रस्तांना सहाय्य करणेसाठी विविध प्रकारच्या वस्तूची आवश्यकता भासते त्यानुसार संभाव्य अतिवृष्टी व इतर सर्व संभाव्य आपत्ती व्यवस्थापन करणेकरिता व पुरस्थितीवर नियंत्रण करणेसाठी मेगा फोन इत्यादी साहीत्याची खरेदी करणेचे आवश्यकता आहे.

त्यानुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली करीता वरील प्रमाणे मेगा फोन पुरवठा करणा-या इच्छुक पुरवठादार / संस्था / फर्म यांचेकडून खालील अटींच्या अधिन राहून दरपत्रके मागविणेत येत आहेत.सदरील दरपत्रके दिनांक २३ /०६/२०२० ते ३०/०६/२०२० अखेर या कार्यालयास पोहचतील अशा प्रकारे पाठविणेत यावीत.

अटी व शर्ती –

१. पुरवठा करणेत येणारे मेगा फोन चे साहीत्य दर्जेदार व नमूद तांत्रिक Specifications नुसार असणे आवश्यक आहे.

२. पुरवठादाराने दरपत्रके त्याच्या अधिकृत Letter Head वर देणे आवश्यक आहे. तसेच त्यामध्ये शॉपअॅक्ट क्रमांक / पॅन नंबर / जी.एस.टी. नंबर इत्यादी नमुद करावे.

३. दरपत्रकांतील सर्व दर हे सर्व करांसहित नमूद करावेत.

४. या कार्यालयाकडून मागणी केलेली वस्तु पुरवठादाराने जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली या कार्यालयांत पोहोच देणेबंधनकारक राहील.

५. पुरवठा करावयाच्या वस्तू हया खराब / ब्रेकेज / सदोष असता कामा नये, असे आढळल्यास अशा वस्तू स्विकारल्या जाणार नाहीत.

६. पुरवठा कालावधीतील देयक अदा करतेवेळी त्यातून नियमानुसार आयकर व इत्यादी कर वसूल करुन घेणेत येतील.

७. प्रत्येक वस्तू निहाय स्वतंत्र रित्या दर पत्रक देणे आवश्यक आहे.

८. दरपत्रके स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी सांगली तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सांगली यांनी राखून ठेवलेला आहेत.

९. मेगा फोन मागणी कमी अथवा जास्त होणेची शक्यता आहे.

१०.दरपत्रकांचा आधारे किमान खर्च हा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांचे अधिन राहून करणेत येणार असलेने प्रक्रिया अंतिम टप्प्यात अथवा कोणत्याही टप्प्यांवर रद्द / स्थगित करण्यात येईल.

११.अटी व शर्ती पुरवठा आदेशासोबत स्वतंत्ररित्या निर्गमित करणेत येतील.

(डॉ.अभिजीत चौधरी)

**जिल्हाधिकारी सांगली तथा**

**अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सांगली**

[redacted]